CMYK

राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार >> पान 2

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक; ६१ जिल्हा परिषद गट व १३ पंचायत समिती सभापतीचे आरक्षण सोडत जाहीर >> पान 3

आशा वर्कर्स ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा; त्यांना कर्मचारी दर्जा मिळालाच पाहिजे : आ. सिद्धार्थ खरात >> पान 4

**सुविचार**

नेहमी प्रयत्नशील राहा.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 77 ■ मंगळवार, दि. 14 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

सैयारा फेम अभिनेत्री अनित पड्डाने केला रॅम्प वॉक

आतील पान

## एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार!; ६ हजार रुपयांचा बोनस जाहीर, १२ हजारांची उचल घेता येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा तसेच वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे जाहिर केला.

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. या बैठकीस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अप्पर मुख्य सचिव संजय सेठी, एस. टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून शासनाने आज हा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एस टी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी तत्वावर (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) एस टी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने सुमारे ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच सन २०२०-२४ दरम्यानच्या वेतन वाढतील फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतना सोबत देण्यात येणार असून यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, असे श्री सरनाईक यांनी सांगितले.



## महाराष्ट्रात आजपासून ४ दिवस वादळी पावसाची शक्यता

**हवामान विभागाचा अंदाज, पिकांची काळजी घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन**

**मुंबई /प्रतिनिधी :** सध्या राज्यात पावसाचा जोर कमी झाला आहे. गेल्या आठ दिवसात राज्यात पावसानं धुमाकूळ घातला होता. यामुळं अनेक भागात पूर आले होते. त्यामुळं संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालं होतं. शेतीचं घरांचं मोठं नुकसान झालं होतं. दरम्यान, पुढील आठवडाभर राज्यात कसं हवामान असेल याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. परवा बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर ते सोमवार दिनांक २० ऑक्टोबर( नरक चतुर्दशी) दरम्यानच्या सहा दिवसात महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहणार आहे. भाग बदलत तुरळक ठिकाणी मध्यम ते किरकोळ पावसाची शक्यता जाणवत असल्याची माहिती खुळे यांनी दिली.

दोन दिवस म्हणजे बुधवार आणि गुरुवार दिनांक १५ ते १६ ऑक्टोबर ला संपूर्ण महाराष्ट्रात मध्यम पावसाची शक्यता अधिक जाणवत असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे. मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने घाबरुन जाण्याची गरज नाही. कारण, सध्या पावसाचा जोर कमी होत असल्याचं चित्र पाहा.यला मिळत आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात आणि सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. उभी पिक वाहून गेली आहेत. जमिनी देखील वाहून गेल्या आहेत. त्यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

## संतापजनक! प्रेताला चाचपून पाहिले , अंगावरच्या दागिन्यांसह अस्थीही लंपास केल्या, जळगावात आठवड्यात सलग दुसरा प्रकार

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव शहरात मानवी संवेदनांना काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. स्मशानभूमीत अंत्यसंस्कारानंतर मृतदेहाच्या अस्थीसह अंगावरील दागिने चोरीस जाण्याच्या घटना वाढू लागल्या असून, केवळ एका आठवड्यात दुसऱ्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. पाच दिवसांपूर्वी मेहरूण स्मशानभूमीत छबाबाई पाटील या महिलेच्या अंत्यसंस्कारानंतर त्यांच्या अस्थी आणि मान-पायाजवळील दागिने गायब झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर या घटनेचा धक्का शहरभर पोहोचत असतानाच, आता शिवाजीनगर स्मशानभूमीतही असाच प्रकार घडल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

नेमके घडले काय?

शिवाजीनगर परिसरातील खडके चाळीत राहणाऱ्या जिजाबाई पाटील यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले होते. त्यांचा परवा शिवाजीनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. आज सकाळी नातेवाईक अस्थी संकलनासाठी स्मशानभूमीत आले असता, त्यांनी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी राखेसह डोके आणि पायाजवळील अस्थी गायब झाल्याचे पाहून धक्का बसला. त्याचबरोबर जिजाबाई पाटील यांच्या अंगावरील सुमारे चार ग्रॅम सोन्याचे दागिनेही गायब झाल्याचे लक्षात आले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत
# महायुतीला घवघवीत यश मिळेल

### मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास, युतीसंदर्भात कार्यकर्त्यांना सूचना

**मुंबई/प्रतिनिधी : महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद नगरपंचायत या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी या बैठकांचं सत्र सुरु आहे. यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्रि्चम महाराष्ट्र हे चार विभागातील बैठका पूर्ण केल्या आहेत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण राज्याच्या विभागात दौरे लावल्याचे फडणवीस म्हणाले. ज्या इंदिराजींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावं लागल्याचे फडणवीस म्हणाले.**



सायंकाळी नागपूर विभागाचा आढावा घेण्यात येईल. पुढील आठवड्यात मुंबई विभागाचा देखील आढावा घेणार असल्याचे फडणवीस म्हणाले. निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांची मानसिकता चांगली आहे. पार्टी देखील सज्ज आहे. आढाव्यामध्ये कार्यकर्त्यांना दिशा निर्देशके देऊन सूचना केल्याचे फडणवीस म्हणाले.

युती संदर्भात देखील सूचना देतो आहे. युती झाली पाहिजे अशा आमच्या सूचना आहेत. युती झाली नाही तरी मित्र पक्षावर कोणीही टीका करु नये अशा प्रकारचे निर्देश देण्यात आल्याचे फडणवीस म्हणाले. होऊ घातलेल्या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळेल असा विश्र्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

यापूर्वी अनेक वेळा संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला. ज्या इंदिराजींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेवरुन पायउतार व्हावं लागलं. संघ एक सांस्कृतिक शक्ती आहे. एक देशभक्त अशा प्रकारचा संघटन आहे. राष्ट्रीय विचाराने प्रेरित मूल्यदिष्ट मानव निर्मितीचा कार्य संघ करतं. प्रसिद्धीसाठी ज्या प्रकारचे पत्र देतात त्याकडे आम्ही बघत सुद्धा नाही असे मुख्यमंत्री म्हणाले.

शिक्षक मतदार संघातील बोगस मतदाना संदर्भात आमच्याकडे एक तक्रार आलेली आहे. ती तक्रार आम्ही निवडणूक आयोगाकडे दिली आहे. येत्या निवडणुकांमध्ये बोगस मतदान होणार नाही याकडे आम्ही लक्ष ठेवून आहोत. खोटे मत नोंदवून कुणालाही या ठिकाणी निवडणूक लढता येणार नाही असे मुख्यमंत्री म्हणाले.

## भाजपने नितीशकुमारांना बरोबरीच्या जागा दिल्या, पण शेवटचा 'हातोडा' मारत करेक्ट कार्यक्रम केल्याची चर्चा!

### मोदींच्या हनुमानाने सुद्धा मांझींचा दबाव झुगारत डाव साधला

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी एनडीएने जागावाटपाची घोषणा केली आहे. भाजप १०१ जागा लढवेल, तर जेडीयू सुद्धा १०१ जागा लढवेल. चिराग पासवान यांचा एलजेपी (आर) २९ जागांवर उमेदवार उभे करेल. जितन राम मांझी यांच्या हिंदुस्तान अवाम मोर्चा (एचएएम) ला सहा जागा आणि उपेंद्र कुशवाह यांच्या आरएलएम ला सहा जागा देण्यात आल्या आहेत. बिहार एनडीएमध्ये जेडीयू आता मोठ्या भावाची भूमिका बजावणार नाही. जेडीयू आणि भाजप दोघेही समान पातळीवर आहेत. जागावाटपात मोदींचे हनुमान समजल्या जाणाऱ्या चिराग पासवान यांचा आग्रह मान्य करण्यात आला आहे. ४० जागांची मागणी करणाऱ्या जीतन राम मांझी यांना सहा जागा देण्यात आल्या आहेत. याचा अर्थ असा की २३४ जागांच्या वाटपात भाजप आणि जेडीयू नंतर लोजपा आणि रामविलास पासवान हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे पक्ष बनले आहेत.

जागावाटपावरून निकालानंतरही केंद्रीय मंत्री चिराग पासवान भाजपसोबतच राहतील हे स्पष्ट आहे. दरम्यान, मांझी आणि कुशवाहा सध्या जेडीयू म्हणजेच नितीश कुमार यांच्यासोबत आहेत. या जागावाटपानंतर दोन्ही पक्षांनी स्पष्ट केले की ते यावर सहमत नाहीत, परंतु युतीच्या अडचणींमुळे त्यांच्याकडे प्रत्येकी सहा जागांवर सहमती दर्शविण्याशिवाय पर्याय नव्हता. येथूनच राजकीय वर्तुळात कोणी कोणाचा करेक्ट कार्यक्रम केला याची चर्चा सुरू झाली आहे.

जेडीयूला १०१ जागा मिळाल्या आहेत. जितन राम मांझी यांना सहा आणि उपेंद्र कुशवाहा यांना सहा जागा मिळाल्या आहेत. जरी तिघेही एकत्र राहिले तरी सर्व जागा जिंकल्यानंतर त्यांच्याकडे फक्त १०१ जागा, किंवा ६+६, किंवा ११३ जागा राहतील. परिणामी, जरी या तिन्ही पक्षांनी सर्व जागा जिंकल्या तरी त्यांना पूर्ण बहुमत मिळू शकणार नाही. यासाठी त्यांना भाजप आणि चिराग पासवान किंवा त्यापैकी एकाची आवश्यकता असेल.

त्यामुळे भाजपने बिहार विधानसभा निवडणुकीच्या योजनेचा पहिला टप्पा पूर्ण केल्याची चर्चा आहे. असे म्हटले जात आहे की चिराग आणि भाजप कोणत्याही परिस्थितीत एकत्र राहतील. जर भाजप आणि चिराग पासवान यांनी त्यांना दिलेल्या जागा जोडल्या >> पान २

## महाराष्ट्रात मंकी पॉक्सचा शिरकाव!

### धुळ्यात आढळला पहिला रुग्ण; प्रशासन अलर्ट मोडवर




**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** जगभरात थैमान घालणाऱ्या मंकी पॉक्सचा राज्यातील पहिला रुग्ण धुळ्यात आढळून आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. रुग्णाचे दोन्ही रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्याने हिरे रुग्णालय प्रशासनही सतर्क झाले आहे. मंकी पॉक्स हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाला स्वतंत्र विलगीकरण कक्षात दाखल करण्यात आले असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी महापालिकेला कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही याबाबत सुचित करण्यात आले आहे.

मंकी पॉक्स बाधित रुग्ण २ ऑक्टोबर रोजी तो सौदी अरेबियाहून धुळ्यातील गरीब नवाज नगर येथे आला होता. गेल्या चार वर्षांपासून तो सौदी अरेबियात वास्तव्यास आहे. त्याच्या मुलीचे लग्न असल्याने तो धुळ्यात आला होता. मात्र, येथे आल्यानंतर त्याला त्वचेचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे तो दि. ३ ऑक्टोबर रोजी हिरे रुग्णालयात तपासणीसाठी गेला. या रुग्णाने हिरे रुग्णालयातील डॉक्टरांना आपला त्रास सांगितला. डॉक्टरांना मंकी पॉक्सची लक्षणे दिसून आल्याने मनपाच्या पथकाने सदर रुग्णाच्या रक्ताचे नमूने घेतले होते. सदर सॅम्पल पुण्यातील एनआयव्हीकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या रुग्णाचा मंक्सी पॉक्सचा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. डॉक्टरांनी शंकेचे निरसन करण्यासाठी पुन्हा रक्ताचे नमूने तपासणीसाठी पाठविले होते.

धुळ्यात आढळलेला मंकी पॉक्सचा रुग्ण हा महाराष्ट्रातील पहिलाच रुग्ण असल्याचे पुण्यातील एनआयव्हीने स्पष्ट केले आहे. मंकी पॉक्समध्ये दोन प्रकारचे व्हेरीयंट आहेत. त्यात क्लायड -१ हा दुर्मिळ व अधिक संसर्गजन्य असतो. भारतात आतापर्यंत याचे ३५ रुग्ण आढळले आहेत. तर महाराष्ट्रातील ही पहिलीच केस आहे. सदर रुग्णाला डायबेटीज असल्याने बरा होण्यासाठी वेळ लागत आहे. मंकी पॉक्स आजार पसरु नये म्हणून महापालिका व जिल्हाधिकारी यांना कळविले असल्याची माहिती रुग्णालयाने दिली आहे.

## मेहकर पंचायत समिती निवडणूक २०२५ साठी आरक्षण जाहीर; राजकीय तापमान चढले

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आरक्षणाचा तक्ता जाहीर झाला असून, त्यानंतर तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तहसील कार्यालय, मेहकर येथे अधिकृतरीत्या ही आरक्षण यादी प्रसिद्ध करण्यात आली.

या आरक्षण घोषणेनंतर उमेदवारांच्या चर्चांना, गटबाजींना आणि पक्षांतरांच्या हालचालींना आता ऊत आला आहे. विविध राजकीय पक्ष आपापल्या पातळीवर मजबूत उमेदवार शोधण्याच्या प्रयत्नात असून, गावपातळीवर वातावरण तापू लागले आहे.

१ देऊळगाव साकराई नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) २ घाटपुरी अनुसूचित जमाती (महिला) ३ शेलगाव देशमुख नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) ४ डोणगाव सर्वसाधारण ५ अंजन बुद्रुक नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ६ पिंपळगाव सर्वसाधारण ७ जाणेफळ सर्वसाधारण (महिला) ८ हिरडा खुर्द सर्वसाधारण ९ कळंबेश्वर अनुसूचित जाती (महिला) विवेकानंद नगर अनुसूचित जाती (महिला) ११ देऊळगाव माळी अनुसूचित जाती १२ चायगाव सर्वसाधारण १३ उकळी सर्वसाधारण (महिला) १४ सोनाटी सर्वसाधारण



**राजकीय रंग चढू लागला!**

या आरक्षणानंतर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मागील निवडणुकीत ज्या गणांमध्ये एका पक्षाचे वर्चस्व होते, त्या ठिकाणी या वेळी आरक्षण बदलल्यामुळे नवीन चेहरे उदयास येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक नेते, माजी सदस्य आणि नवोदित तरुण कार्यकर्ते उमेदवारीसाठी सक्रिय झाले असून, मेहकर तालुक्यातील निवडणुकीचा रंग आता हळूहळू गडद होताना दिसत आहे.

CMYK

>> पान २

## ई कचऱ्याविषयी जागरुकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्रि्चम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्रि्चत केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

# राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार

## आगामी निवडणुकांसाठी शरद पवारांची घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील राजकीय पक्षाना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले असून मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. एकीकडे प्रशासनाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांसाठी आरक्षण सोडत जाहीर होत असून दुसरीकडे राजकीय पक्षांच्या बैठका आणि रणनीती सुरू आहे. तसेच, महाविकास आघाडी आणि महायुती होणार की नाही, यावरही मंथन सुरू आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत महत्त्वाची घोषणा करण्यात आली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राजकीय पार्श्र्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार असल्याचे शरद पवारांनी जाहीर केले.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आजच्या बैठकीत आगामी निवडणुकांसंदर्भात मोठी घोषणा करण्यात आली. जास्तीत जास्त तरुणांना संधी कशा प्रकारे देता येतील यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना पदाधिकाऱ्यांना शरद पवारांकडून देण्यात आल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आगामी काळात कशा प्रकारे युती करायची याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांची उद्या बैठक पार पडणार असल्याची देखील माहिती बैठकीत देण्यात आली. येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत निर्णय करा, अशा सूचनाही शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. दरम्यान, आपल्याकडे इच्छुकांची संख्या खूप आहे. काम करणाऱ्यांची संख्या खूप आहे, आज अल्पसंख्याक समाजाचा



निर्णय घेतला असेच युवक आणि युवतींचा निर्णय होणार आहे, असे पवारांनी सांगितले.

दरम्यान, आजच्या बैठकीत शरद पवारांना धर्मनिरपेक्षता जपण्याचं आवाहनही सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केलं आहे. सातत्याने वादग्रस्त बोलणाऱ्या संग्राम जगताप यांच्या वक्तव्याचा निषेधही शरद पवारांनी नोंदवला. पूर्वी आपल्या पक्षात असणारे एक आमदार सध्या जाती-जातीत तणाव निर्माण होईल, अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत, हे अत्यंत चुकीचं आहे. जातीय सलोखा ठेवा, स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर बोलत असताना जातीवाचक बोलू नका, बोलताना प्रेमाची भाषा वापरा, आपण करत असलेल्या विधानामुळे जातीय सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना देखील शरद पवारांनी बैठकीत दिल्या आहेत. तसेच, राजकारणात जाती धर्मावर राजकारण करण्याची महाराष्ट्राची परंपरा नाही. लोकांच्या लोकप्रियतेपेक्षा ते जास्त महत्वाचे आहे. वाचाळवीर वाढले आहेत, दुदैव आहे कोणी कोणाकडून काय खरेदी करावे यावर सरकार गप्प बसते? सरकारचा त्याला पाठिंबा आहे का? दरी निर्माण केली जातोय, असेही पवारांनी म्हटले.

अतिवृष्टीच्या संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे, ती तटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येऊन पाहणी केली पाहिजे होती, आमच्या वेळेस केंद्रीय पथक येऊन पाहणी करुन भरघोस मदत देत होते. नरसिंह राव जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा ते राज्यात अतिवृष्टीच्या पाहण्यासाठी येणार होते. पण, तेव्हा मीच त्यांना पाहण्यासाठी येऊ नका असे म्हटले. कारण, शासकीय यंत्रणा तुमच्या दौऱ्यासाठी लागेल, त्यामुळे मदतही होणार नाही, अशी माहिती शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना भाषणादरम्यान दिली.

पान १ वरून...

## भाजपने नितीशकुमारांना बरोबरीच्या

तर १०१+२९ मिळून १३० जागा होतील. जर भाजप आणि चिराग पासवान स्वतःहून १२२ चा जादुई बहुमताचा आकडा गाठला तर त्यांना नितीश कुमारांची गरज राहणार नाही. आता प्रश्र्न असा आहे की, चालू असलेली चर्चा खरोखर खरी आहे का? खरं झाल्यास नितीशकुमारांच्या राजकारणाची शोकांतिका असेल.

२००३ मध्ये पक्ष स्थापन केल्यानंतर, जेडीयूने २००५ मध्ये पहिली निवडणूक लढवली. जागावाटपाच्या सूत्रावर नजर टाकली तर, २००५ नंतर जेडीयूच्या जागा २७ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. त्यावेळी पक्षाने १३८ जागांवर निवडणूक लढवली. तर २०१० मध्ये जेडीयूने सर्वाधिक १४१ जागा लढवल्या. आता ते १०१ जागांवर निवडणूक लढवत आहे. २०२५ च्या जागावाटपाच्या सूत्रानुसार, १५ वर्षांत पक्षाच्या जागा ४० ने कमी झाल्या आहेत. म्हणजेच १५ वर्षांत जेडीयूच्या जागा सुमारे २९ टक्के कमी झाल्या आहेत. तर भाजपने २००५ मध्ये १०१ जागांवर निवडणूक लढवली होती आणि २०२५ मध्येही १०१ जागांवर निवडणूक लढवत आहे.

## सैयारा फेम अभिनेत्री अनित पड्डाने केला रॅम्प वॉक

**मुंबई/प्रतिनिधी** : रविवारी झालेल्या लॅक्मे ग्रँड फिनालेमध्ये ब्लॉकबस्टर चित्रपट सैय्यारा ची मुख्य अभिनेत्री अनीत पड्डा शोस्टॉपर म्हणून रॅम्पवर चालली. अनीत पड्डा सोनेरी, बॉडी-फिटेड गाऊनमध्ये खूपच ग्लॅमरस दिसत होती. तथापि, तिच्या चालण्याच्या शैलीमुळे अनेकजण तिला ट्रोल करत आहेत. लॅक्मे फॅशन वीकच्या ग्रँड फिनालेमध्ये अनिता पड्डाने डिझायनर तरुण ताहिलियानीचा डिझायनर आउटफिट परिधान केला होता.लॅक्मे फॅशन वीकच्या ग्रँड फिनालेमध्ये अनिता पड्डाने डिझायनर तरुण ताहिलियानीचा डिझायनर आउटफिट परिधान केला होता.हा डिझायनर ड्रेस तरुण ताहिलियानीच्या नव्याने लाँच झालेल्या बेज्वेल्ड कलेक्शनचा एक भाग होता.हा डिझायनर ड्रेस तरुण ताहिलियानीच्या नव्याने लाँच झालेल्या बेज्वेल्ड कलेक्शनचा एक भाग होता.अनितने सोनेरी चमकदार पोशाख आणि मोत्याच्या ब्रेसलेटसह तिचा लूक पूर्ण केला. तिने सोनेरी उंच टाचांनी आणि केस उघडे ठेवून कमीत कमी मेकअपने तिचा लूक पूर्ण केला. अनितने सोनेरी चमकदार पोशाख आणि मोत्याच्या ब्रेसलेटसह तिचा लूक पूर्ण केला. तिने सोनेरी उंच टाचांनी आणि केस उघडे ठेवून कमीत कमी मेकअपने तिचा लूक पूर्ण केला.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन : मानवमुक्तीचा नवा अध्याय

१४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय इतिहासातील एक विलक्षण आणि परिवर्तनकारी दिवस म्हणून सदैव स्मरणात राहील. १९५६ साली याच दिवशी नागपूर येथील दीक्षाभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन भारतीय समाजात एक नवे सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक युग आरंभले. या घटनेने केवळ धर्मांतराचा एक प्रसंग निर्माण केला नाही, तर भारतीय समाजव्यवस्थेतील शतकानुशतके प्रस्थापित झालेल्या विषमता, अन्याय, अस्पृश्यता आणि गुलामीविरुद्धचा एक अभूतपूर्व सामाजिक क्रांतीचा पाया रचला. हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातो आणि आजही लाखो लोक दीक्षाभूमीकडे श्रद्धेने नतमस्तक होण्यासाठी, बौद्ध विचारधारा नव्याने आत्मसात करण्यासाठी आणि मानवी मूल्यांचे पुनर्जागरण करण्यासाठी एकत्र येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या अमानवी स्वरूपावर टीका केली. त्यांच्या मते, जात हा धर्माचा भाग नसून मानवी विषमतेला न्याय्य ठरविण्याचे एक साधन आहे. जात ही भारतीय समाजाच्या प्रगतीला मारक ठरलेली सर्वात मोठी सामाजिक व्याधी आहे, असे ते म्हणत. या विषम व्यवस्थेविरुद्ध त्यांनी केवळ राजकीय आणि कायदेशीर लढा दिला नाही, तर माणसाच्या अंतःकरणातील विचार आणि श्रद्धेचे परिवर्तन हेच अंतिम समाधान असल्याचे त्यांनी ओळखले. त्यासाठीच त्यांनी बुद्धाच्या विचारांचा स्वीकार केला.

बुद्धाने सांगितलेला धम्म हा करुणा, प्रज्ञा आणि समतेचा मार्ग आहे. त्यात ईश्र्वर, आत्मा किंवा विधी-अंधश्रद्धेला स्थान नाही. अत्त दीपो भव म्हणजेच स्वतःचा दीप बन ही बुद्धाची शिकवण आंबेडकरांनी आपल्या सामाजिक आणि वैचारिक जीवनात आत्मसात केली. बौद्ध धम्माची निवड ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी धार्मिक नव्हे तर मानवी अस्तित्वाची पुनर्परिभाषा होती. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमीवर झालेल्या त्या महासांस्कृतिक घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिशरणांचा स्वीकार करून २२ प्रतिज्ञा घेतल्या. या प्रतिज्ञांनी भारतीय समाजाला एका नव्या मानवतावादी धर्माची, नव्या सामाजिक नैतिकतेची आणि विचारस्वातंत्र्याच्या नवीन युगाची दारे उघडली.

या प्रतिज्ञांमध्ये विशेषतः जातीभेद, कर्मकांड, मूर्तिपूजा, ब्राह्मणवादी वर्चस्व आणि अंधश्रद्धेचा त्याग करण्याचा स्पष्ट संदेश आहे. त्यांनी सांगितले की मी हिंदू देवाची पूजा करणार नाही, मी कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेवर विश्र्वास ठेवणार नाही, आणि मी बुद्धाचा धम्म स्वीकारतो जो विज्ञान, तर्क आणि करुणेवर आधारलेला आहे. या प्रतिज्ञा केवळ धार्मिक नव्हत्या; त्या सामाजिक, नैतिक आणि राजकीय क्रांतीचा घोष होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मांतराचा संदर्भ हा भारतातील दलित समाजाच्या स्वाभिमान, आत्मसन्मान आणि अस्तित्वाच्या लढ्याशी जोडलेला आहे. हजारो वर्षांच्या गुलामीतून, अस्पृश्यतेच्या वेदनांमधून बाहेर पडून त्यांनी स्वतःच्या अस्तित्वाला मानवी मूल्यांची ओळख दिली. बुद्धधम्माचा स्वीकार म्हणजे मानवतेचा स्वीकार, समतेचा स्वीकार, आणि विचारस्वातंत्र्याचा स्वीकार होय. दीक्षाभूमी ही त्या नवजागरणाची तीर्थभूमी ठरली. आज ती केवळ धार्मिक स्थळ नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या नवसंस्कृतीचे प्रतीक आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्र्वभूमीवर आपण पाहतो की आजही भारतीय समाजात जाती, धर्म, वंश, लिंगभाव आणि आर्थिक विषमता अस्तित्वात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न केवळ कायद्यातील समानतेपुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक आणि मानसिक समानतेपर्यंत पोहोचावे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व नागरिकांना समान हक्क दिले, परंतु त्यांनी याचबरोबर स्पष्ट इशारा दिला की, राजकीय समानता आणि सामाजिक असमानता एकत्र टिकू शकत नाहीत. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन ही केवळ एक ऐतिहासिक आठवण नव्हे, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.

बुद्धाचा धम्म म्हणजे मध्यममार्ग आहे. जो न अति भोगवादात आहे, न अति संन्यासात. तो विवेक, संयम आणि करुणेचा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा मार्ग भारतीय समाजासाठी योग्य का मानला, याचे उत्तर त्यांच्या विचारांत सापडते. त्यांनी म्हटले, की बुद्धाने मला विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले. बुद्धधम्म हा व्यक्तीच्या स्वतंत्र विचारक्षमतेचा आणि तर्कनिष्ठतेचा धर्म आहे. तो कोणत्याही प्रकारच्या दैवी अधिकारावर विश्र्वास ठेवत नाही, तर माणसाच्या स्वतःच्या बुद्धीवर विश्र्वास ठेवतो.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी लाखो अनुयायी नागपूरच्या दीक्षाभूमीवर एकत्र येतात. येथे केवळ धार्मिक विधी होत नाहीत, तर वाचन, चिंतन, व्याख्याने, समाजसेवा आणि जनजागृती यांचे आयोजन केले जाते. लोक बुद्धाची शिकवण केवळ विहारात नव्हे, तर आपल्या आचरणात उतरवतात. हा दिवस सामूहिक ऐक्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या भावनेचा उत्सव आहे.

बुद्धाचे अहिंसा, मैत्री, करुणा आणि सम्यक दृष्टी हे धम्माचे मूलतत्त्व आजच्या जगासाठीही अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक स्तरावर वाढत असलेला धार्मिक द्वेष, हिंसा, असहिष्णुता आणि पर्यावरणीय संकटे पाहता बुद्धधम्म आणि बौद्ध तत्त्वज्ञान आज अधिक सुसंगत वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, जग बदलायचे असेल, तर विचार बदलावे लागतील. आजही त्या विचारांचीच गरज आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणजे माणसाच्या आत्मजागृतीचा दिवस आहे. तो प्रत्येकाला विचार करायला लावतो की आपण माणूस म्हणून किती प्रगल्भ आहोत? आपल्या समाजात अजूनही भेदभाव आहे का? आपण खऱ्या अर्थाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे पालन करतो का? बुद्धधम्मचा स्वीकार म्हणजे या प्रश्र्नांना प्रामाणिकपणे सामोरे जाणे होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हे संघर्षाचे, पण त्याहूनही अधिक विचारक्रांतीचे प्रतीक होते. त्यांनी समाजात मनुष्य म्हणून जगण्याचा हक्क मागितला आणि तो मिळवून दिला. त्यांनी धर्माला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांनी दाखवून दिले की धर्म जर माणसाला समानतेचा, प्रेमाचा आणि स्वातंत्र्याचा संदेश देत नसेल, तर तो धर्म माणसाचा शत्रू आहे. म्हणूनच त्यांनी सांगितले, जात हा धर्म नाही, आणि धर्म जर विषमता शिकवत असेल, तर असा धर्म माणसाचा शत्रू आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिन हा त्या विचाराचा पुनर्जन्म आहे. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की खरा धर्म तोच, जो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देतो. बुद्धधम्मने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ वैयक्तिक शांती दिली नाही, तर संपूर्ण समाजाला नव्या आत्मविश्र्वासाची प्रेरणा दिली. आज लाखो अनुयायी त्यांच्या धम्ममार्गावर चालत आहेत, त्यांच्या जीवनात बुद्ध, धम्म आणि संघ हे त्रिरत्न जिवंत आहेत.

आजच्या तरुण पिढीसमोर बुद्ध आणि आंबेडकरांचे विचार अधिक सुसंगत आहेत. शिक्षण, तर्क, विज्ञान, पर्यावरण आणि मानवी हक्कांच्या प्रश्र्नांवर बुद्धधम्माची शिकवण आजही मार्गदर्शक आहे. करुणा आणि प्रज्ञा यांच्या संतुलनाने समाजात शांतता निर्माण होऊ शकते. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन हा फक्त एका धर्माचा उत्सव नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या नवजागृतीचा संदेश देणारा दिवस आहे. आज आपण या दिवसाचे स्मरण करताना फक्त ऐतिहासिक अभिमान बाळगू नये, तर त्या विचारांचे अनुकरण करावे. समाजात अजूनही अन्याय, विषमता आणि हिंसा आहे. आंबेडकरांचे धम्मांतर हे त्या सर्वाविरुद्धचा अखंड संघर्ष आहे. त्यांचा संदेश स्पष्ट आहे की माणसाच्या मनात जोवर अंधश्रद्धा, भय आणि दास्यभाव आहे, तोवर त्याचे खरे स्वातंत्र्य शक्य नाही. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या विचारांमध्ये प्रकाश आणावा, अंधाराला दूर करावे आणि मानवतेचा मार्ग स्वीकारावा.

दीक्षाभूमीवर दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना लाखो अनुयायांचे एकत्र येणे म्हणजे एका आदर्श समाजाच्या निर्मितीचे प्रतीक आहे. असा समाज जो जात, धर्म, वर्ग, लिंगभेदापलीकडे जाऊन समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारलेला आहे. हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आणि बुद्धाला मानवतेची अभिवादन करण्याची सर्वोत्तम पद्धत आहे.

शेवटी, धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाही, तर भविष्याचे दिशादर्शन करतो. हा दिवस आपल्याला सांगतो की परिवर्तन शक्य आहे. जेव्हा माणूस विचार करतो, प्रश्र्न विचारतो आणि सत्याचा मार्ग स्वीकारतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी जे चक्र प्रवर्तित केले, ते केवळ धर्माचे नव्हे, तर मानवतेचे धम्मचक्र होते, जे आजही फिरत आहे, आणि सदैव फिरत राहील.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक;
# ६१ जिल्हा परिषद गट व १३ पंचायत समिती सभापतीचे आरक्षण सोडत जाहीर

दैनिक आपला विदर्भ







**नागपूर/प्रतिनिधी** :बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटांची आरक्षण सोडत आणि सर्व पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत पद्धतीने प्रक्रिया पार पडली.

बुलढाणा जिल्हा परिषद गटासाठी आरक्षण पुढीलप्रमाणे : अनुसूचित जाती एकूण १२ जागेपैकी सर्वसाधारण ६, महिला ६, अनुसूचित जमाती एकूण ३ जागेपैकी सर्वसाधारण १, महिला २, नागरिकांचा मागास प्रवर्ग एकूण १६ जागेपैकी सर्वसाधारण ८ महिला ८, सर्वसाधारण एकूण ३० जागेपैकी सर्वसाधारण १५, महिला १५ अश्या एकूण ६१ जागांसाठी आरक्षण सोडत उत्साहात पार पडली.

**जळगांव जामोद तालुक्यातील** १-जामोद(अनुसूचित जमाती), २-खेर्डा बु.-(सर्वसाधारण), ३-आसलगाव-(अनुसूचित जमाती महिला), ४-पिंपळगांव काळे(सर्वसाधारण).

**संग्रामपूर तालुक्यातील** ५-सोनाळा(अनुसूचित जमाती महिला), ६- बावणबीर(सर्वसाधारण महिला), ७- पळशी झाशी(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग) ८-पातुर्डा बु.(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला).

**शेगांव तालुक्यातील** ९-माटरगांव बु (अनुसूचित जाती), १०-जलंब(अनुसुचित जाती महिला), नांदूरा-तालुक्यातील ११-निमगांव(सर्वसाधारण महिला), १२-वसाडी बु.(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), १३-चांदूर बिस्वा (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), १४-वडनेर भोलजी (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग).

**मलकापूर तालुक्यातील** १५-नरवेल(सर्वसाधारण महिला), १६-मलकापूर ग्रामीण (सर्वसाधारण महिला), १७- दाताळा(सर्वसाधारण महिला).

**मोताळा तालुक्यातील** १८-पिंप्रीगवळी (सर्वसाधारण), १९-कोथळी (सर्वसाधारण),२०-धामणगांव बढे(सर्वसाधारण महिला), २१-रोहिणखेड (सर्वसाधारण), २२-बोराखेडी (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग).

**खामगाव तालुक्यातील** २३-सुटाळा बु.(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), २४- घाटपुरी(सर्वसाधारण), २५-अटाळी (अनुसूचित जाती), २६-अंत्रज (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), २७- पिंपळगाव राजा(सर्वसाधारण महिला), २८- कुंबेफळ (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), २९-लाखनवाडा (अनुसूचित जाती).

मेहकर तालुक्यातील ३०-देऊळगाव साकशी (सर्वसाधारण महिला), ३१-डोणगाव(सर्वसाधारण), ३२-अंजनी बु. (सर्वसाधारण), ३३-जानेफळ (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), ३४- कळंबेश्वर (अनुसूचित जाती महिला), ३५-देऊळगाव माळी (अनुसूचित जाती), ३६-उकळी (सर्वसाधारण (महिला).

**चिखली तालुक्यातील** ३७-उदयनगर (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग),३८-अमडापुर (सर्वसाधारण महिला), ३९- इसोली (सर्वसाधारण), ४०-सवणा (सर्वसाधारण महिला), ४१-केळवद (अनुसूचित जाती महिला), ४२-शेळगाव आटोळ (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), ४३-मेरा बु. (अनुसूचति जाती महिला).

**बुलढाणा तालुक्यातील** ४४ देऊळघाट (सर्वसाधारण महिला), ४५-सुंदरखेड (अनुसूचित जाती महिला), ४६-साखळी बु.(सर्वसाधारण महिला), ४७-मासरुळ (सर्वसाधारण), ४८-धाड (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), ४९-रायपुर (सर्वसाधारण महिला). देऊळगाव राजा तालुक्यातील ५०-देऊळगाव महि (सर्वसाधारण), ५१ सिनगाँव जहॉगीर (सर्वसाधारण), ५२-सावखेड भोई (अनुसूचित जाती). सिंदखेड राजा तालुक्यातील ५३-साखरखेर्डा(सर्वसाधारण महिला), ५४-शेंदुर्जन (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला), ५५- किनगांव राजा (सर्वसाधारण), ५६-दुसरबीड (अनुसूचित जाती महिला), ५७-वर्दडी बु.(नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला).

**लोणार तालुक्यातील** ५८-सुलतानपुर(सर्वसाधारण), ५९-वेणी (अनुसूचित जाती), ६०-बिबी(सर्वसाधारण), ६१-पांग्रा डोळे (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला).

**बुलढाणा जिल्ह्यातील १३ पंचायत समित्यामधील सभापती आरक्षण याप्रमाणे** : बुलढाणा तालुका- अनुसूचित जाती, नांदुरा-अनुसुचित जाती(महिला), मोताळा-अनुसुचित जाती, चिखली अनुसुचित जमाती(महिला), खामगांव- नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला), मेहकर-नागरिकांचा मागास प्रवर्ग, शेगांव-नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला), देऊळगाव राजा-सर्वसाधारण (महिला), लोणार-सर्वसाधारण (महिला), सिंदखेड राजा- सर्वसाधारण, मलकापूर- नागरिकांचा मागास प्रवर्ग, जळगांव जामोद-सर्वसाधारण(महिला), संग्रामपूर- सर्वसाधारण.

या सोडतीच्या प्रक्रियेस मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, तहसीलदार संजय बगाडे आदींसह संबंधित अधिकारी, जनप्रतिनिधी तसेच विविध पंचायत समित्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### बायकोसह सासरच्या मंडळींकडून छळ; बीडमध्ये तरुणाने चिठ्ठी लिहून संपवले जीवन, गुन्हा दाखल

**बीड/प्रतिनिधी:** सासरच्या जाचाला कंटाळून किंवा सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या त्रासामुळे मुलीने, सुनेने जीवन संपवल्याच्या अनेक घटना घडतात. पुरोगामी म हाराष्ट्रात आजही हुंडाबळी, पैशांची मागणी करत सुनेचा छळ केला जातो, त्यास पतीचीही मदत असते. मात्र, बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणे हद्दीत पत्नी आणि सासरच्या मंडळींना कंटाळून एका तरुणाने गळफास घेत जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी, मुलाने आत्म हत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीवरुन तलवाडा पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

भागवत अंकुश राठोड असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून याप्रकरणी त्याची आई सुनिता राठोड यांनी तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीनुसार भागवत राठोड याला पत्नी, सासरा आणि मामेसासरा हे मानसिक त्रास देत होते. त्यामुळे तो नैराश्यात होता असे म्हटले आहे. त्यातूनच त्याने १ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक सुसाईड नोटही लिहून ठेवली, ज्यात होणाऱ्या त्रासाचा उल्लेख करण्यात आला आहे. मुलाच्या निधनाच्या दु:खातून सावरल्यानंतर भागवतच्या आईने पोलिसांत ही तक्रार नोंदविली आहे. दरम्यान, याप्रकरणी त्याची पत्नी राणी राठोड, सासरा संतोष राठोड आणि मामेसासरा दत्ता राठोड यांच्या विरोधात तलवाडा पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान, याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत. मात्र, सासरच्या त्रासाल कंटाळून जीव देण्यापर्यंत टोकाचं पाऊस भागवतने का उचललं, याचाही तपास पोलीस करत आहेत.

### औंधच्या राणीसाहेबांनी म्यानातून तलवार उपसली, हवेत नाचवली, अजित पवार बघतच बसले

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अलीकडच्या काळात कोणताही वाद, आक्षेपार्ह वक्तव्य किंवा कृती यापासून चार हात लांब राहताना दिसतात. अनेकदा अजित पवार आपल्या अतिउत्साही कार्यकर्त्यांना सबुरीने वागण्याचा सल्ला देतात. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या चमकोगिरी, दिखाऊपणा किंवा फाजीलपणा करणाऱ्या आपले नेते आणि कार्यकर्त्यांना ते अनेकदा झापतानाही दिसून आले आहेत. मात्र, शनिवारी साताऱ्यातील एका कार्यक्रमात अजित पवार यांच्यावर अशाच एका प्रसंगामुळे अवघडल्याची परिस्थिती आली.अजित पवार हे शनिवारी सातारा जिल्ह्यातील औंध येथे गेले होते. याठिकाणी श्रीमंत हर्षिता राजे इंग्लिश मीडियम हायस्कूलचा नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर अजित पवार यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी अजित पवार यांना लहानसा पुष्पगुच्छ आणि तलवार देऊन त्यांचा मानपान करण्यात आला. शरद पवार यांच्या तालमीत घडल्यामुळे अजित पवार एरवी हवेत तलवार उंचावणे किंवा क्रेनने हार घालून घेणे, असे प्रकार टाळताना दिसतात. परंतु, शनिवारी औंधच्या राणी गायत्रीदेवी यांनी अजित पवार यांच्यासमोरच मंचावर तलवार म्यानातून बाहेर काढली. त्यानंतर राणी गायत्रीदेवी यांनी सुरुवातीला ही तलवार हवेत उंचावून दाखवली. त्यानंतर त्यांनी ती तलवार अजित पवार यांना दाखवली. त्यावर अजित पवार यांनी फार विशेष प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, राणी गायत्रीदेवी यांनी यांनी त्यानंतर उत्साहाने ही तलवार हवेत फिरवली. यानंतर त्यांनी तलवार म्यान करुन पुन्हा हवेत उंचावत 'हर हर महादेव'ची घोषणा दिली.

## अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर हल्ला; एक जखमी

**जळगाव/प्रतिनिधी:** जळगाव अवैध वाळू वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, आता वाळू माफियांनी सरकारी कर्मचाऱ्यांवर थेट जीवघेणे हल्ले सुरू केले आहेत. चोपडा तालुक्यात महसूल विभागाच्या पथकावर झालेल्या धक्कादायक हल्ल्यात एक कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे.

तापी नदीच्या पात्रातून अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच महसूल विभागाचे पथक कारवाईसाठी गेले होते. मात्र, या कारवाईदरम्यान वाळू माफियांनी पथकावर जोरदार हल्ला केला, ज्यामुळे महसूल विभागाचा एक कर्मचारी गंभीर जखमी झाला.

या घटनेनंतर चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस



उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी शासनाकडून ठोस पावले उचलली नसल्याने अशा घटनांमध्ये वाढ होत आहे. वाळू लिलाव प्रक्रियेत अडथळे आल्यामुळे विकासकामांवरही परिणाम होत असून, वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्याची मागणी होत आहे.

अण्णासाहेब घोलप म्हणाले, "आम्ही हल्लेखोरांना ओळखून कठोर कारवाई करू, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पूर्ण खबरदारी घेण्यात येत आहे."

## शेतकऱ्याच्या नरडीचा बिबट्याने घेतला घोट

**बीर्ड/प्रतिनिधी:** गेल्या अनेक वर्षापासून डोंगर-दऱ्यात बिबट्या दर्शन देत असून शेळ्या, वासरांचा फडशा पाडल्याचे प्रकार समोर येत आहेत. वनविभागाने याची वेळीच दखल घेऊन बिबट्या जेरबंद करावा अशी मागणी होत असताना वनविभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने रविवारी रात्री एक अघटित घटना घडली आणि एका शेतकऱ्याचा जीव गेला. या घटनेमुळं तोंडाला रक्त लागलेला बिबट्या अन् त्याच्या दहशतीने भेदारलेले ग्रामस्थ आता भयभीत झाल्याचं दिसून येत आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील बावी गावाअंतर्गत येणाऱ्या दरेवाडी येथील तरुण शेतकरी राजेंद्र गोल्हार वय वर्ष ३५ हे रविवारी सकाळी जनावरं घेऊन आपल्या शेतात गेले होते. जनावरं परतली पण राजेंद्र घरी न आल्याने शोधाशोध सुरू झाला. त्यांच्या गायब होण्याचे तर्कवितर्क लागत असताना आष्टीच्या प्रशासनासह ग्रामस्थांनी अंधारात परिसर पिंजून काढला असता एक पाय नसलेला आणि गळ्याला गंभीर जखमा झालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याचे समोर आले. वारंवार बिबट्या लोकांना दिसत असताना देखील वनविभागाकडून त्याला पकडण्याकडे दुर्लक्ष केले गेल्याने आज ही एक मोठी दुर्देवी घटना घडली आहे, असा आरोप गावातील लोकांनी केला. तोंडाला रक्त लागलेला बिबट्याही लोकांना दिसल्याचा दावा ते करत आहेत. हा एकूणच प्रकार पाहून भेदारलेले लोक यामुळे तालुक्यातील डोंगर-दऱ्यातील जनता भयभीत झाली आहे. वनविभागाकडून आता तरी ठोस उपाय योजना करून तोंडाला रक्त लागलेल्या बिबट्याला जेरबंद करावं अशी मागणी केली जात आहे.

## चीननंतर आता अमेरिकेची भारताच्या क्षेपणास्त्र चाचण्यांवर हेरगिरी?

### हिंदी महासागरात ओशन टायटन दिसल्याने खळबळ



नवी दिल्ली : भारताच्या क्षेपणास्त्र चाचणीच्या पल्ल्यामुळे केवळ चीन आणि पाकिस्तानच नाही तर अमेरिकेलाही धक्का बसला आहे. चीनपाठोपाठ आता अमेरिकेने आपले ओशन टायटन नावाचे गुप्तचर जहाज हिंदी महासागरात पाठवले आहे. भारत १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान बंगालच्या उपसागरात ३५५० किलोमीटर पल्ल्याचे क्षेपणास्त्र चाचणी करणार आहे. ओशन टायटनसह, चीनचे युआन वांग-५ देखील मलाक्का सामुद्रधुनी ओलांडून हिंदी महासागरात पोहोचेल आणि या भारतीय क्षेपणास्त्रावर लक्ष ठेवेल. यापूर्वी, भारतीय क्षेपणास्त्र चाचण्यांदरम्यान हिंद महासागरात चिनी युआन वांग-क्लास पाळत ठेवणारी जहाजे दिसली होती, परंतु भारतीय क्षेपणास्त्र चाचणीदरम्यान या प्रदेशात अमेरिकेचे संशोधन जहाज दिसण्याची ही पहिलीच वेळ आहे.

भारत आणि अमेरिकेतील संबंधांमध्ये अलिकडच्या काळात निर्माण झालेल्या तणावामुळे चीनप्रमाणेच अमेरिका आता भारताच्या क्षेपणास्त्र चाचण्यांवर हेरगिरी करत आहे का, असे प्रश्न्र उपस्थित केले जात आहेत. ऑपरेशन सिंदूरपासून, ट्रम्प प्रशासन पाकिस्तानशी संबंध मजबूत करण्यासाठी काम करत आहे. अहवालांनुसार, ओशन टायटन अलीकडेच मालदीवमध्ये दिसले. चिनी संशोधन जहाजे देखील मालदीवमधून भारताच्या क्षेपणास्त्र चाचण्यांवर लक्ष ठेवून आहेत.

६ ऑक्टोबर रोजी भारताने या क्षेपणास्त्र चाचणीबाबत एक नोटाम (हवाई दलाला सूचना) जारी केली. सुरुवातीला, या चाचणीसाठी नो-फ्लाय झोन रेंज १४८० किलोमीटर निश्चित करण्यात आली होती, परंतु दुसऱ्या दिवशी, त्याची रेंज २५२० किलोमीटरपर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर, फक्त २२ तासांत, त्याची रेंज ३५५० किलोमीटरपर्यंत वाढविण्यात आली. यामुळे हे क्षेपणास्त्र कोणते क्षेपणास्त्र असू शकते याबद्दल अटकळ बांधली जात आहे. २५ सप्टेंबर रोजी, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड यांनी २००० किलोमीटर पल्ल्याच्या अग्नि-प्राइमची चाचणी केली. १५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान नियोजित चाचणी अग्नि-मालिका क्षेपणास्त्राची देखील असू शकते असा अंदाज आहे.

भारताच्या शस्त्रागारात अनेक अग्नि क्षेपणास्त्रे आहेत, त्यापैकी सर्वात लांब पल्ल्याची पल्ल्याची क्षमता ५००० किलोमीटर आहे. अग्नि-५ ची मारक क्षमता जवळजवळ संपूर्ण आशियापर्यंत पसरली आहे, ज्यामध्ये पाकिस्तान आणि चीनच्या उत्तरेकडील भागांसह तसेच युरोपच्या काही भागांचा समावेश आहे. देशाच्या दीर्घकालीन सुरक्षा गरजा लक्षात घेऊन ते विकसित करण्यात आले आहे. अग्नि-५ क्षेपणास्त्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे चखठत तंत्रज्ञान. चखठत म्हणजे मल्टीपल इंडिपेंडेंटली टार्गेटेबल री-एंट्री व्हेईकल. या तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्राला अनेक अण्वस्त्रे वाहून नेण्याची परवानगी मिळते, ज्यामुळे ते अनेक लक्ष्यांवर मारा करू शकते.

## मुंबईसाठी भाजपला बिहारपेक्षा अधिक गरज बच्चू कडूचे सरकारवर आणि निवडणूक प्रक्रियेवर थेट निशाणा

दैनिक आपला विदर्भ

रतनागिरीतर्फे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींवर आणि मुंबईत भाजपाला असलेल्या महत्त्वावर आपले मत व्यक्त केले. त्यांनी आणि मशीनच्या पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, जर काँग्रेसने इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन आणली नसती, तर निवडणुकीतील अनेक पाप आमच्या मातीला लागले नसते.

बच्चू कडू म्हणाले, "मत मागायला जावं की, न जावं अशी अवस्था झाली आहे. जे स्क्रीनवर दिसते, ते आमच्या हाती आले पाहिजे. खऱ्या अर्थाने प्रभू रामचंद्रांचे भक्त असतील तर, आमच्या हाती आले पाहिजे, त्यावर आमचे नाव, सही आणि क्रमांक असले पाहिजे. ते हाती आले कीच मतपेटीत टाकले पाहिजे. माझे मत कुठे गेले, हे सरकार आणि निवडणूक आयोगाला दाखवताच येत नाही."

शिवसेना आणि मनसे यांच्या राजकीय युतीबाबतही बच्चू कडू यांनी विचार मांडले. त्यांच्या मते, "झेंडा जरी असला तरी अजेंडा काय आहे? इकडे राज ठाकरे मराठीचा बाणा घेऊन उभे आहेत, तर काँग्रेस पूर्ण राज्यात मराठीचा मुद्दा घेऊन जाऊ शकत नाही. बाहेरच्या राज्यात काँग्रेसला नुकसान होऊ शकते. जर काँग्रेस महानगरपालिकेत लढली, तर भाजपाला मुंबईची अधिक गरज आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, "राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी एकत्र लढली, तर निवडून येणारी भाजप राहील, हे सरळ गणित आहे. हे राजकारण आहे." बच्चू कडू यांच्या या वक्तव्यांनी




मुंबईतील निवडणूक रणनीती, पक्षीय युती आणि मतदारांवर विश्वास याबाबत चर्चेला नवीन वळण दिले आहे.

# आशा वर्कर्स ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा; त्यांना कर्मचारी दर्जा मिळालाच पाहिजे : आ. सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** आशा वर्कर्स आणि गटप्रवर्तक या ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या खऱ्या कणखर आधारस्तंभ आहेत. कोविडसारख्या संकटकाळात त्यांनी जीव धोक्यात घालून सेवा बजावली. शासनाने त्यांच्या कामाची दखल घेत कर्मचारी दर्जा देणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी मी स्वतः शासनस्तरावर पाठपुरावा करणार आहे,'' असा ठाम निर्धार आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केला.

ते सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या चौथ्या जिल्हा अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. हे अधिवेशन १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मेहकर येथील कृषी वैभव लॉन्स येथे उत्साहात पार पडले. अधिवेशनाच्या





अध्यक्षस्थानी कॉ. पंजाबराव गायकवाड होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानांना, समाजसेवकांना तसेच पुरोगामी चळवळीतील महापुरुषांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संघटनेच्या मागील तीन वर्षांच्या कामाचा आंदोलनात्मक आणि संघटनात्मक अहवाल जयश्री तायडे यांनी मांडला, तर कोषाध्यक्ष ललिता बोदडे यांनी आर्थिक अहवाल सादर केला. अधिवेशनात आगामी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली. राज्य फेडरेशनच्या अध्यक्षा कॉ. आनंदी अवघडे, कोषाध्यक्ष अर्चना घूगरे, साहित्यिक सुरेश साबळे, तसेच अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा प्रतिभा पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महिलांच्या हक्कांसाठी अधिक ठोस आणि संघटित लढा देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

मंचावर शहराध्यक्ष किशोर गारोळे, रश्मी दुबे, शितल देशमुख, मंदा मसाळ, कविता चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री तायडे आणि सुलोचना गाडेकर यांनी केले. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी श्रीकिसन मानवतकर, रफिक भाई कुरेशी, बेबी नंदा अंभोरे, हर्षा घायाळ, बालीताई धायडे, वर्षा शेळके यांच्यासह असंख्य आशा सेविकांनी परिश्रम घेतले. मंगला काकडे यांनी आभारप्रदर्शन करून अधिवेशनाची सांगता केली. अधिवेशनाच्या शेवटी आशा सेविकांनी घोषणांनी वातावरण दणाणले ''आम्हाला सन्मान, हक्क आणि कर्मचारी दर्जा हवा!'' या घोषणांमुळे महिलांच्या हक्कांसाठीचा लढा नव्या जोमाने पेट घेताना दिसला.

आशा'' आता केवळ नाव नाही, तर न्याय आणि सन्मानासाठी उभा राहिलेला सशक्त आवाज आहे.

## बालकाच्या मृत्यूनंतर सात औषधांच्या वितरण-विक्रीवर बंदी; अन्न व औषध प्रशासनाचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** सहा वर्षांच्या बालकाचा सर्दी-खोकल्याचे औषध घेतल्यानंतर मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शिवम सागर गुरनुले असे मृत बालकाचे नाव असून, तो कळंब तालुक्यातील पिंपळखुटी गावचा रहिवासी आहे. बालकाला सर्दी-खोकल्यासाठी खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना अचानक प्रकृती बिघडली. तत्काळ शासकीय रुग्णालयात रेफर केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मेडिकल प्रशासनाने अन्न व औषध प्रशासन विभागाला दिली. त्यानंतर विभागाने संबंधित मेडिकलमधून सात औषधांचे नमुने तपासणीसाठी घेतले असून, त्या औषधांचे वितरण आणि विक्री थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## मोटर सायकलवर देशी दारुची अवैध वाहतूक करणारा आरोपी माना पोलिसांच्या जाळ्यात!; १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त





दैनिक आपला विदर्भ

**माना/प्रतिनिधी :**अवैध दारू व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चीत चांडक यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या ''ऑपरेशन प्रहार'' मोहिमेअंतर्गत माना पोलिसांनी आणखी एक यशस्वी कारवाई करत देशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस पकडण्यात यश मिळवले आहे.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी ग्राम जितापूरखेडकर रस्त्यावर सापळा रचण्यात आला. या दरम्यान मोटर सायकलवरून देशी दारूची अवैध वाहतूक करणारा उमेश सुरेश गोंडाणे (वय ३५, रा. माना, ता. मुर्तिजापूर) हा पोलिसांच्या तावडीत सापडला. त्याच्या ताब्यातून २०० नग देशी दारू 'बॉबी संत्रा' (९० मि.ली.), एक व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन व मोटर सायकल असा एकूण ₹१ लाख ६ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चीत चांडक, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बदेली चंद्रकांत रेड्डी, आणि मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत ठाणेदार गणेश नावकार, पोलीस उपनिरीक्षक गणेश महाजन, पोलीस हवालदार उमेश हरमकर, व पोलीस शिपाई प्रमोद हिवराळे यांचा मोलाचा सहभाग होता.

## कारंजा शहरात पोलिसांची मोठी जुगारधाड, ४८ जणांना अटक



दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** वाशीम जिल्ह्यातील कारंजा शहरात पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाने बुधवारी मोठ्या प्रमाणावर जुगारधाड टाकली. या कारवाईत ४८ जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले की, टीन शेड असलेल्या हॉटेलच्या मागील खोलीत मोठ्या प्रमाणावर जुगार सुरू होते. खोलीत ५ टेबलवर थ्री कार्ड खेळ चालू होते, जिथे रोख रक्कम आणि मोबाईल्स ठेवलेले होते.

या छाप्यात पोलिसांनी ३७ हजार रुपयांची रोख रक्कम, ३० हून अधिक मोबाईल फोन तसेच जुगार खेळण्यासाठी आणलेली २ फोर व्हीलर, ३ ऑटो आणि १२ मोटरसायकली जप्त केल्या आहेत.

सांगण्यासारखे म्हणजे, गेल्या आठ दिवसांत कारंजा शहरात आणि पोलिस अधीक्षकांच्या टीमने तब्बल ४ वेळा ही प्रकाराची कारवाई केली आहे. तरीही नागरिकांनी या प्रकारावर चिंता व्यक्त केली आहे. स्थानिक पोलिसांना शहरातील बेकायदेशीर जुगार केंद्रांची माहिती का होत नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

पोलिसांनी यापुढे ही कारवाई नियमित करण्याचे आश्वासन दिले आहे.

## राऊतांमुळे मनसे नाराज, उलटसुलट चर्चांना उधाण येताच राऊतांचा राज ठाकरेंना मेसेज

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असताना मनसे प्रमुख राज ठाकरे आणि काँग्रेसबाबत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत केलेल्या वक्तव्यामुळे मनसेत नाराजीचे सूर उमटले आहेत. ''राज ठाकरे यांना काँग्रेस सोबत हवी आहे'' असे विधान संजय राऊत यांनी केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

संजय राऊत पत्रकार परिषदेत म्हणाले होते की,स्वत: राज ठाकरे यांची इच्छा आहे की, आपल्याला महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सुद्धा सोबत घेणे गरजेचे आहे. ही त्यांची एक भूमिका आहे. मात्र, याचा अर्थ तो निर्णय नाही. या राज्यात प्रत्येकाचे एक स्थान आहे. जसे शिवसेनेचे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे, शरद पवार साहेबांचे, डाव्या पक्षांचे तसेच काँग्रेस सुद्धा महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा पक्ष आहे. शिष्टमंडळात काँग्रेसचा समावेश होणे गरजेचं आहे. ही सर्वांचीच भूमिका असून राज ठाकरेंची सुद्धा तीच भूमिका आहे, असे त्यांनी म्हटले होते.

राज ठाकरे यांना काँग्रेस हवी आहे, या संजय राऊत यांच्या वक्तव्यामुळे मनसेच्या नेत्यांनी नाराजी केली आहे. आमच्या पक्षाची भूमिका आम्ही मांडू. काँग्रेसला आम्ही कोणताही प्रस्ताव दिला नाही,असे म्हणत मनसेच्या नेत्यांनी माध्यमांसमोर आपली नाराजी बोलून दाखवली.

या नाराजीनंतर संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना वैयक्तिक मेसेजद्वारे स्पष्टीकरण दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मी असे काहीही बोललो नाही. आपल्या वक्तव्याचा तो अर्थ नाही असे स्पष्टीकरण संजय राऊत यांनी राज ठाकरेंना दिल्याचे समजते.दरम्यान, संजय राऊत यांना मुंबईतील भांडुप इथल्या फोर्टिज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मागील आठवड्यात त्यांची अ‍ॅन्जिओग्राफी झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतरही संजय राऊत यांनी छत्रपती संभाजीनगर दौरा केला होता. यावेळी त्यांना त्रास जाणवू लागला होता. आज पुन्हा फोर्टीस रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्यांना अस्वस्थ जाणवत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

## पुण्यातील पोलीस शिपायाला बेदम मारहाण, गुन्हा दाखल

**पुणे /प्रतिनिधी:** पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून विविध गुन्ह्यात वाढ होत आहे. पुण्यात गेल्या काही दिवसात पोलिसच असुरक्षित असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील लॉ कॉलेज रोडवर काही जणांकडून पोलिसांना मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच, रविवारी रात्री उंड्री पिसोळीजवळ रस्त्याच्या बाजूला लघुशंका करणारया पोलीस शिपायाला बेदम मारहाण केल्याची घटना घडलीय. अशा या घटनांनी पुण्यात पोलिसच असुरक्षित असल्याचं बोललं जातंय. प्रवीण रमेश डिंबळे असं मारहाण झालेल्या पोलीस शिपायाचं नाव असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## रिसोड येथे आंतरजिल्हयातील चोरी करणारी टोळी जेरबंद

### रिसोड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी – ८,२४,०००/– रू. किंमतीच्या बुलेटसह ०९ मोटार सायकली जप्त



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून पोलीस स्टेशन रिसोड हददीतून मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी. बी. पथकास मार्गदर्शन करून चोरांचा शोध घेवून मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यावरून डी.बी. पथकाने तांत्रिक व आधुनिक पध्दतीने तपास करून व मिळालेल्या गुप्त माहितीवरून दिनांक १२ सप्टेंबर रोजी संशयित इसम नामे सचिन उर्फ मिठठू अशोक मानकर, वय २८ वर्षे, रा. रामनगर, ता. रिसोड, जि.वाशिम यास ताब्यात घेवून त्यास चोरी गेलेल्या मोटार सायकलीबाबत कौशल्यपूर्वक विचारपूस केली असता त्याने वाशिम व हिंगोली जिल्हयातून मोटार सायकली चोरी केल्याची कबूली दिली. त्यानंतर नमूद आरोपी याचेकडून पोलीस स्टेशन रिसोड व वाशिम शहर इत्यादी ठिकाणच्या एकूण ०९ मोटार सायकल किंमत ८,२४,०००/– रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, मा. सहायक पोलीस अधीक्षक, वाशिम नवदिप अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वाखाली डी. बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार प्रशांत राजगुरू, महादेव चव्हाण, आशिष पाठक, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, सुनिल तिवाले, अमोल ठाकरे, विश्वास चव्हाण तसेच सायबर सेलचे संदीप वाकूडकर यांनी केली आहे.

# मुर्तिजापूर तालुक्यातील बक-या चोरीचा छडा

## माना पोलिसांकडून ४ लाखांहून अधिक माल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**माना/प्रतिनिधी :** माना पोलिसांनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणत मोठी कामगिरी केली आहे. बक-या चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीस अटक करून तब्बल ₹४ लाख ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी फिर्यादी अनिल रामदास साबळे (वय ५५, रा. राजनापूर खिनखिनी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला) यांनी पोलिस स्टेशन माना येथे दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या गोठ्याचा टिन वाकवून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश




केला व ८ बक-या व १ बोकड असा एकूण ₹६३,००० रुपयांचा पशुधन चोरीला गेल्याची नोंद करण्यात आली होती.

सदर घटनेच्या तपासात घटनास्थळी कोणतेही सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने आरोपीचा शोध घेणे कठीण झाले होते. तरीसुद्धा, माना पोलिसांनी तपास कौशल्याचा वापर करून आणि गुप्त यंत्रणा सक्रिया करून अकोला, वाशिम आणि अमरावती जिल्ह्यातील माहिती गोळा केली.

या दरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, ग्राम टाकरखेड शंभू, ता. भातकुली, जि. अमरावती येथील आरोपी अजिम शाह कलीम शाह उर्फ बबलु (वय ३५) यानेच सदर चोरी केली आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे तपास पथक आरोपीला अटक करून चौकशी केली असता, त्याच्याकडून चोरीस गेलेल्या ९ पैकी ७ बक-या (किंमत ₹४९,०००) आणि गुन्ह्यात वापरलेले टाटा एस वाहन (क्रमांक -३८ १०५८, किंमत ₹४ लाख) असा एकूण ₹४,४९,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बदेली चंद्रकांत रेड्डी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे (मुर्तिजापूर) आणि स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांचे मार्गदर्शनाखाली, ठाणेदार गणेश नावकार यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गणेश महाजन, पोहेकॉ दीपक सोळंके, पो.शि. आकाश काळे यांनी केली.